|| श्री गणेशाय नमः ||

||SHREE GANESHAY NAMAH||

# मराठी आरती संग्रह

# (MARATHI AARATI SANGRAH)

## श्री साई गणेशोत्सव मंडळ, उसरणी.

(SHREE SAI GANESHOTSAV MANDAL, USARANI)

www.usarani.com

श्री साई गणेशोत्सव मंडळ, उसरणी.

# अनुक्रमणिका


१. वक्रतुंड महाकाय (Vakratund Mahakaay)

2. सुखकर्ता दुःखहर्ता (Sukhkarta Dukhaharta)

३. शेंदूर लाल चढायो (Shendur Lal Chadhayo)

४. लवलवती विक्राळा (Lavlavti Vikrala)

५. दुर्गे दुर्घट भारी (Durge Durghat Bhari)

६. युगे अठ्ठाविस (Yuge Atthavis)

७. ओवाळू आरती माझ्या मदन गोपळा (Ovalu Aarati Mazya)

८. येई हो विठ्ठले (Ye Ho Vitthale)

९. आरती सप्रेम (Aarati Saprem)

१०. आरती ज्ञानराजा (Aarati Gyanraja)

११. आरती एकनाथा (Aarati Eknatha)

१२. आरती तुकारामा (Aarati Tukarama)

१३. आरती रामदासा (Aarati Ramdasa)

१४. आरती साईबाबा (Aarati Saibaba)

१५. मै तो आरती उतारू (Main To Aarati Utaru)

१६. धन्य धन्य हो प्रदक्षिणा (Dhanya Dhanya Ho Pradakshina)

१७. घालीन लोटांगण (Ghalin Lotangan)

१८. सदा सर्वदा (Sada Sarvada)

१९. मोरया मोरया मी बाळ तान्हे (Morya Moaya Mi Bal Tanhe)

# १. ॥ प्रार्थना ॥

वक्रतुंड महाकाय । सुर्यकोटि समप्रभ ।
निर्विघ्नं कुरू में देव । सर्व कार्येषु सर्वदा ॥

# २. ॥ श्री गणपतीची आरती ॥ (सुखकर्ता दुःखहर्ता)

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची । नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।
सर्वांगी सुंदर उटि शेंदूराची । कंठी झळकेमाळ मुक्ता फळाची ॥
जय देव जय देव जय मंगलमुर्ती हो श्री मंगलमुर्ती ।
दर्शनमात्रे मन चरणामात्रे मन कामना पुरती ॥ जय देव जय देव ॥ धृ ॥
रत्नखचित फरा तुज गौरी कुमरा । चंदनाची ऊटी कुंकुम केशरा ।
हिरेजडीत मुकुट शोभतो बरा । रूणझुणती नूपुरे चरणी घागरीया ॥
जय देव जय देव जय मंगलमुर्ती हो श्री मंगलमुर्ती ।
दर्शनमात्रे मन चरणामात्रे मन कामना पुरती ॥ जय देव जय देव ॥ १ ॥
लंबोदर पितांबर फणिवर बंधना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।
दास रामाचा वाट पाहे सदना । संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवर वंदना ॥
जय देव जय देव जय मंगलमुर्ती हो श्री मंगलमुर्ती ।
दर्शनमात्रे मन चरणामात्रे मन कामना पुरती ॥ जय देव जय देव ॥ २ ॥

# ३. ॥ श्री गणपतीची आरती ॥ (शेंदुर लाल चढायो)

शेंदुर लाल चढायो अच्छा गजमुखको । दोंदिल लाल बिराजे सुत गौरीहरको ।
हाथ लिये गुडलड्डू सांई सुरवरको । महिमा कहे न जाय लागत हूं पदको ।
जयजयजी गणराज विद्यासुखदाता हो स्वामी सुखदाता ॥
धन्य तुम्हारा दरसन मेरा मन रमता ॥ धृ ॥
अष्टौ सिद्धी दासी संकटको वैरी । विघ्नविनाशन मंगल—मूरत अधिकारी ।
कोटीसूरजप्रकाश ऐसी छबि तेरी । गंडस्थळमदमस्तक झूले शशिबहारी ।
जयजयजी गणराज विद्यासुखदाता हो स्वामी सुखदाता ॥
धन्य तुम्हारा दरसन मेरा मन रमता ॥ १ ॥
भावभगतसे कोई शरणागत आवे । संतत संपत सबही भरपूर पावे ।
ऐसे तुम महाराज मोंको अति भावे । गोसावीनंदन निशिदिन गुण गावे ।
जयजयजी गणराज विद्यासुखदाता हो स्वामी सुखदाता ॥
धन्य तुम्हारा दरसन मेरा मन रमता ॥ २ ॥

# ४. ॥ शंकराची आरती ॥

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा । विषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा ।
लावण्य सुंदर मस्तकीबाळा । तेथुनिया जळ निर्मळ वाहे झुळझुळा ।
जय देव जय देव जय श्रीशंकरा हो स्वामी शंकरा ।
आरती ओवाळू भावार्थी ओवाळू तुज कर्पुरगौरा । जय देव जय देव ॥ धृ ॥
कर्पुरगौरा भोळा नयनी विशाळा । अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा ।
विभुतीचे उधळण शितिकंठ नीळा । ऐसा शंकर शोभे उमा वेल्हाळा ॥
जय देव जय देव जय श्रीशंकरा हो स्वामी शंकरा ।
आरती ओवाळू भावार्थी ओवाळू तुज कर्पुरगौरा । जय देव जय देव ॥ १ ॥
देवीं दैत्यीं सागर मंथन पैं केलें । त्यामाजी अवचित हळहळ जे उठले ।
ते त्वा असुरपणे प्राशन केले । नीळकंठ नाम प्रसिद्ध झाले ॥
जय देव जय देव जय श्रीशंकरा हो स्वामी शंकरा ।
आरती ओवाळू भावार्थी ओवाळू तुज कर्पुरगौरा । जय देव जय देव ॥ २ ॥
व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी । पंचानन मनमोहन मुनिजन सुखकारी ।
शतकोटीचे बीज वाचे उच्चारी । रघुकुलतिलक रामदासा अंतरी ॥
जय देव जय देव जय श्रीशंकरा हो स्वामी शंकरा ।
आरती ओवाळू भावार्थी ओवाळू तुज कर्पुरगौरा । जय देव जय देव ॥ ३ ॥

# ५. ॥ देवीची आरती ॥

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी । अनाथ नाथे अंबे करूणा विस्तारी ।
वारी वारी जन्म मरणांते वारी । हारी पडलो आता संकट नीवारी ॥
जय देवी जय देवी जय महिषासुर मथिनी ।
सुरवर ईश्वरवरदे तारक संजीवनी । जय देवी जय देवी ॥ धृ ॥
त्रिभुवनी भुवनी पाहता तुज ऐसी नाही । चारी श्रमले परंतु न बोलवे कांही ।
साही विवाद करितां पडलों प्रवाहीं । ते तु भक्तांलागी पाविसी लवलाही ॥
जय देवी जय देवी जय महिषासुर मथिनी ।
सुरवर ईश्वरवरदे तारक संजीवनी । जय देवी जय देवी ॥ १ ॥
प्रसन्न वदने प्रसन्न होसी निजदासा । क्लेशांपासुनी सोडी तोडी भवपाशा
अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा । नरहरी तल्लिन झाला पदपंकजलेशा ॥
जय देवी जय देवी जय महिषासुर मथिनी ।
सुरवर ईश्वरवरदे तारक संजीवनी । जय देवी जय देवी ॥ २ ॥

# ६. ॥ विठ्ठलाची आरती ॥ (युगे अठ्ठाविस)

युगे अठ्ठाविस विटेवरी उभा । वामांगी रखुमाई दिसे भव्य शोभा
पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा । चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ॥
जय देव जय देव जय पांडुरंगा हो हरि पांडुरंगा । रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा
पावे जिवलगा । जय देव जय देव ॥ धृ ॥
तुळसीमाळा गळां कर ठेवुनि कटी । कांसे पीतांबर कस्तुरि लल्लाटि ।
देव सुरवर नित्य येती भेटी । गरुड हनुमंत पुढे उभे राहती ॥
जय देव जय देव जय पांडुरंगा हो हरि पांडुरंगा ।
रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा । जय देव जय देव ॥ १ ॥
धन्य वेणूनाद अणूक्षेत्रपाळा । सुवर्णाची कमळे वनमाळा गळा ।
राई रखुमाबाई राणीया सकळा । ओवाळीती राजा विठोबा सांवळा ॥
जय देव जय देव जय पांडुरंगा हो हरि पांडुरंगा ।
रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा । जय देव जय देव ॥ २ ॥
ओवाळू आरत्या कुर्वंड्या येती । चंद्रभागेमध्ये सोडुनिया देती ।
दिंड्या पताका वैष्णव नाचती । पंढरीचा महिमा—द्वारकेचा महिमा वर्णावा किती ॥
जय देव जय देव जय पांडुरंगा हो हरि पांडुरंगा ।
रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा । जय देव जय देव ॥ ३ ॥
आषाढी कार्तिकी भक्तजन येती हो साधुजन येती । चंद्रभागेमध्ये स्नानें जे करिती ।
दर्शनहेळामात्रे तयां होय मुक्ती । केशवासी नामदेव-माधवासी नामदेव भावे ओवाळीती ॥
जय देव जय देव जय पांडुरंगा हो हरि पांडुरंगा ।
रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा । जय देव जय देव ॥ ४ ॥

# ७. ॥ विठ्ठलाची आरती ॥ (येई हो विठ्ठले)

येई हो विठ्ठले माझे माउली ये ॥ निढळावरी कर ठेवूनि वाट मी पाहें ॥ धृ. ॥
आलिया गेलिया हातीं धाडी निरोप ॥ पंढरपुरीं आहे माझा मायबाप ॥
येई हो विठ्ठले माझे माउली ये ॥ निढळावरी कर ठेवूनि वाट मी पाहें ॥ १ ॥
पिवळा पीतांबर कैसा गगनीं झळकला । गरुडावरि बैसोनि माझा कैवारी आला ॥
येई हो विठ्ठले माझे माउली ये ॥ निढळावरी कर ठेवूनि वाट मी पाहें ॥ २ ॥
विठोबाचें राज्य आम्हां नित्य दिपवाळी ॥ विष्णुदास नामा जीवेंभावें ओवाळी ॥
येई हो विठ्ठले माझे माउली ये ॥ निढळावरी कर ठेवूनि वाट मी पाहें ॥ ३ ॥
असो नसो भाव आम्हां तुझिया ठायां । कृपादृष्टि पाहे माझ्या पंढरीराया ॥
येई हो विठ्ठले माझे माउली ये ॥ निढळावरी कर ठेवूनि वाट मी पाहें ॥ ४ ॥

# ८. ॥ श्रीकृष्णाची आरती ॥

ओवाळूं आरती माझ्या मदन गोपाळा । शामसुंदर गळां वैजयंती माळा ॥ धृ. ॥
चरणकमल ज्याचे अतिसुकुमार । ध्वजवज्रांकुश ब्रीदाचे तोडर ॥
ओवाळूं आरती माझ्या मदन गोपाळा । शामसुंदर गळां वैजयंती माळा ॥ १ ॥
नाभिकमल ज्याचें ब्रह्मयाचें स्थान । हृदयीं पदक शोभे श्रीवत्सलांछन ॥
ओवाळूं आरती माझ्या मदन गोपाळा । शामसुंदर गळां वैजयंती माळा ॥ २ ॥
मुखकमल पाहतां सूर्याचिया कोटी । वेधलें मानस हारपली दृष्टि ॥
ओवाळूं आरती माझ्या मदन गोपाळा । शामसुंदर गळां वैजयंती माळा ॥ ३ ॥
जडितमुगुट ज्याचे दैदिप्यमान । तेणें तेजें कोंदलें अवघें त्रिभुवन ॥
ओवाळूं आरती माझ्या मदन गोपाळा । शामसुंदर गळां वैजयंती माळा ॥ ४ ॥
एका जनार्दनीं देखियलें रूप ॥ रूप पाहों जातां अवघें झालें तद्रूप ॥
ओवाळूं आरती माझ्या मदन गोपाळा । शामसुंदर गळां वैजयंती माळा ॥ ५ ॥

# ९. ॥ श्रीदशावतारांची आरती ॥

आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्म । भक्तसंकटीं नाना स्वरूपीं स्थापुनि स्वधर्म ॥ धृ. ॥
अंबऋषीकारणें गर्भवास सोशीसी । वेद नेले चोरूनि ब्रह्मा आणुनियां देसी ।
मत्स्यरूपी नारायण सप्तहि सागर धुंडीसी । हस्त लागतां तुझा शंखासुरा वर देसी ॥
आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्म ॥ १ ॥
रसातळासी जातां पृथ्वी पाठीवर घेसी । परोपकारासाठीं देवा कासव झालासी ।
दाढे धरूनि पृथ्वी नेतां वराहरूप होसी । प्रल्हादाकारणें नरहरी स्तंभीं गुरगुरसी ॥
आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्म ॥ २ ॥
पांचवे अवतार बळिच्या द्वाराला जासी । भिक्षे स्थळ मागुनी बळिला पाताळीं नेसी ।
सर्व समर्पण केलें म्हणुनि प्रसन्न त्या होसी । वामनरूप धरूनि बळिच्या द्वारी तिष्ठसी ॥
आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्म ॥ ३ ॥
सहस्त्रार्जुन मातला जनदग्नीचा वध केला । कष्टी ते रेणुका म्हणुनि सहस्त्रार्जुन वधिला ।
निःक्षत्री पृथ्वी दान दिधली विप्राला । सहावा अवतार परशुराम प्रगटला ॥
आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्म ॥ ४ ॥
मातला रावण सर्वा उपद्रव केला । तेहतिस कोटी देव बंदी हरिलें सितेला ।
पितृवचनासाठी रामें वनवास केला । मिळवुनि वानरसेना राजा राम प्रगटला ॥
आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्म ॥ ५ ॥

देवकी–वसुदेव बंदी मोचन त्वां केले । नंदाघरिं जाऊनि निजसुख गोकुळा दिधले ।
गोरसचोरी करितां नवलक्ष गोपाळ मिळविले । गोपिकांचे प्रेम पाहुनि श्रीकृष्ण भुलले ॥
आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्म ॥ ६ ॥
बौद्ध कलंकी कलियुगीं अधर्म हा अवघा । सोडून दिधला धर्म म्हणूनी न दिससी देवा ।
म्लेंच्छमर्दन करीसी म्हणुनी कलंकी केशवा । बहिरवी जान्हवी द्यावी निजसुखा–नंदाची सेवा ॥
आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्म ॥ ७ ॥

# १०. ॥ श्रीज्ञानदेवाची आरती ॥

आरती ज्ञानराजा । महाकैवल्यतेजा । सेविती साधुसंत ।
मनु वेधला माझा ॥ आरती ज्ञानराजा ॥ धृ. ॥
लोपले ज्ञान जगीं । हित नेणती कोणी । अवतार पांडुरंग । नाम ठेविलें ज्ञानी ॥
आरती ज्ञानराजा । महाकैवल्यतेजा । सेविती साधुसंत ।
मनु वेधला माझा ॥ आरती ज्ञानराजा ॥ १ ॥
कनकाचे ताट करीं । उभ्या गोपिका नारी । नारद तुंबरही । साम गायन करी ॥
आरती ज्ञानराजा । महाकैवल्यतेजा । सेविती साधुसंत ।
मनु वेधला माझा ॥ आरती ज्ञानराजा ॥ २ ॥
प्रगट गुह्य बोले । विश्व ब्रह्मचि केलें । रामा जनार्दनी । पायी मस्तक ठेविले ॥
आरती ज्ञानराजा । महाकैवल्यतेजा । सेविती साधुसंत ।
मनु वेधला माझा ॥ आरती ज्ञानराजा ॥ ३ ॥

# ११. ॥ श्रीएकनाथाची आरती ॥

आरती एकनाथा ॥ महाराजा समर्था । त्रिभुवनीं तूंचि थोर ।
जगद्गुरू जग्न्नाथा ॥ आरती एकनाथा ॥ धृ. ॥
एकनाथ नाम सार । वेदशास्त्रांचें गूज । संसारदुःख नासे । महामंत्रांचें बीज ॥
आरती एकनाथा ॥ महाराजा समर्था । त्रिभुवनीं तूंचि थोर ।
जगद्गुरू जग्न्नाथा ॥ आरती एकनाथा ॥ १ ॥
एकनाथ नाम घेतां । सुख वाटलें चित्ता । अनंत गोपाळदास । धणी न पुरे गातां ॥
आरती एकनाथा ॥ महाराजा समर्था । त्रिभुवनीं तूंचि थोर ।
जगद्गुरू जग्न्नाथा ॥ आरती एकनाथा ॥ २ ॥

# १२. ॥ श्रीतुकारामाची आरती ॥

आरती तुकारामा ॥ स्वामी सद्‌गुरूधामा ।
सच्चिदानंदमूर्ति । पाय दाखवीं आम्हां ॥ आरती तुकारामा ॥ धृ. ॥
राघवें सागरांत । पाषाण तारिले ।
तैसे हे तुकोबाचे । अभंग उदकीं रक्षिले ॥
आरती तुकारामा ॥ स्वामी सद्‌गुरूधामा । सच्चिदानंदमूर्ति ।
पाय दाखवीं आम्हां ॥ आरती तुकारामा ॥ १ ॥
तुकितां तुलनेसी । ब्रह्म तुकासी आलें ॥
म्हणोनि रामेश्वरें । चरणीं मस्तक ठेविलें ॥
आरती तुकारामा ॥ स्वामी सद्‌गुरूधामा । सच्चिदानंदमूर्ति ।
पाय दाखवीं आम्हां ॥ आरती तुकारामा ॥ २ ॥

# १३. ॥ श्रीरामदासाची आरती ॥

आरती रामदासा ॥ भक्तविरक्त ईशा ।
उगवला ज्ञानसूर्य । उजळोनी प्रकाश ॥ आरती रामदासा ॥ धृ. ॥
साक्षात् शंकराचा । अवतार मारूती ।
कलिमाजीं तेचि जाली । रामदासाची मूर्ती ॥
आरती रामदासा ॥ भक्तविरक्त ईशा । उगवला ज्ञानसूर्य ।
उजळोनी प्रकाश ॥ आरती रामदासा ॥ १ ॥
वीसही दशकांचा । दासबोध ग्रंथ केला ।
जडजीवां उद्धरिलें । नृप शिवासी तारिलें ॥
आरती रामदासा ॥ भक्तविरक्त ईशा । उगवला ज्ञानसूर्य ।
उजळोनी प्रकाश ॥ आरती रामदासा ॥ २ ॥
ब्रह्मचर्य व्रत ज्यांचे । रामरूप सृष्टि पाहे ।
कल्याण तिहीं लोकीं । सामर्थ्य सद्‌गुरूपाय ॥
आरती रामदासा ॥ भक्तविरक्त ईशा ।
उगवला ज्ञानसूर्य । उजळोनी प्रकाश ॥ आरती रामदासा ॥ ३ ॥

श्री साईनाथ ... मंडळ, उसरणी.

# १४. ॥ श्रीसाईबाबांची आरती ॥

आरती साईबाबा ॥ सौख्यदातारा जीवा ।
चरणरजतळीं निज दासां विसांवा । भक्तां विसावा ॥ आरती साईबाबा ॥ धृ. ॥
जाळुनियां अनंग । स्वस्वरूपीं राहे दंग ।
मुमुक्षुजना दावी । निज डोळां श्रीरंग ॥
आरती साईबाबा ॥ सौख्यदातारा जीवा ।
चरणरजतळीं निज दासां विसांवा । भक्तां विसावा ॥ आरती साईबाबा ॥ १ ॥
जया मनीं जैसा भाव । तया तैसा अनुभव ।
दाविसी दयाघना । ऐसी ही तुझी माव ॥
आरती साईबाबा ॥ सौख्यदातारा जीवा ।
चरणरजतळीं निज दासां विसांवा । भक्तां विसावा ॥ आरती साईबाबा ॥ २ ॥
तुमचें नाम घ्यातां । हरे संसृतिव्यथा ।
अगाध तव करणी । मार्ग दाविसी अनाथा ॥
आरती साईबाबा ॥ सौख्यदातारा जीवा ।
चरणरजतळीं निज दासां विसांवा । भक्तां विसावा ॥ आरती साईबाबा ॥ ३ ॥
कलियुगीं अवतार । सगुणब्रह्म साचार ।
अवतीर्ण झालासे । स्वामी दत्त दिगंबर ॥
आरती साईबाबा ॥ सौख्यदातारा जीवा ।
चरणरजतळीं निज दासां विसांवा । भक्तां विसावा ॥ आरती साईबाबा ॥ ४ ॥
आठा दिवसां गुरूवारीं । भक्त करिती वारी ।
प्रभुपद पहावया । भवभय निवारी ॥
आरती साईबाबा ॥ सौख्यदातारा जीवा ।
चरणरजतळीं निज दासां विसांवा । भक्तां विसावा ॥ आरती साईबाबा ॥ ५ ॥
माझा निजद्रव्य ठेवा । तव चरणरजसेवा ।
मागणें हेंचि आतां । तुम्हां देवाधिदेवा ॥
आरती साईबाबा ॥ सौख्यदातारा जीवा ।
चरणरजतळीं निज दासां विसांवा । भक्तां विसावा ॥ आरती साईबाबा ॥ ६ ॥
इच्छित दीन चातक । निर्मळ तोय निजसुख ।
पाजावें माधवा या । सांभाळ आपुली भाक ॥
आरती साईबाबा ॥ सौख्यदातारा जीवा ।
चरणरजतळीं निज दासां विसांवा । भक्तां विसावा ॥ आरती साईबाबा ॥ ७ ॥

श्री साईं गणेश प्रकाशन, उमरगा.

# १५. ॥ जय संतोषी माता आरती ॥

मैं तो आरती उतारूं रे संतोषी माता की । जय जय संतोषी माता जय जय माँ ।
जय जय संतोषी माता जय जय माँ ॥
बडी ममता है, बडा प्यार माँ की आंखो में । माँ की आंखों में ।
बडी करूणा माया दुलार माँ की आंखो में । माँ की आंखों में ।
क्यूं न देखूं मैं बारमबार माँ की आखों में । माँ की आंखों में ।
दिखे हर घडी । दिखे हर घडी नया चमत्कार माँ की आंखो में ।
नृत्य करूं छुम छुम झम झमा झम झुम झुम झांकी निहारूं रे ।
ओ प्यारी प्यारी झांकी निहारूं रे ॥
मैं तो आरती उतारूं रे संतोषी माता की । जय जय संतोषी माता जय जय माँ ।
जय जय संतोषी माता जय जय माँ ॥ १ ॥
सदा होती है जय जयकार माँ के मंदिर में । माँ के मंदिर में ।
नित्त झांझर की होए झनकार माँ के मंदिर में । माँ के मंदिर में ।
सदा मंजिरे करते पुकार माँ के मंदिर में । माँ के मंदिर में ।
दिखे हर घडी । दिखे हर घडी नया चमत्कार माँ के मंदिर में ।
दीप धरूं धूप करूं प्रेम सहित भक्ति करूं जीवन सुधारूं रे ।
ओ प्यारा प्यारा जीवन सुधारूं रे ॥
मैं तो आरती उतारूं रे संतोषी माता की । जय जय संतोषी माता जय जय माँ ।
जय जय संतोषी माता जय जय माँ ॥ २ ॥

# १६. ॥ प्रदक्षिणा ॥

धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्‌गुरूरायाची ।
झाली त्वरा सुरवरां । विमान उतरायाची ॥ धृ. ॥
पदोपदीं अपार झाल्या पुण्याच्या राशी ।
सर्वहि तीर्थें घडली आम्हां आदिकरूनि काशी ॥
धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्‌गुरूरायाची ।
झाली त्वरा सुरवरां । विमान उतरायाची ॥ १ ॥
मृदंग टाळ ढोल भक्त भावार्थे गाती ।
नामसंकीर्तनें ब्रह्मानंदें नाचती ॥
धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्‌गुरूरायाची ।
झाली त्वरा सुरवरां । विमान उतरायाची ॥ २ ॥

कोटि ब्रह्महत्या हरती करितां दंडवत ।
लोटांगण घालितां मोक्ष लोळे पायांत ॥
धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्‌गुरूरायाची ।
झाली त्वरा सुरवरां । विमान उतरायाची ॥ ३ ॥
गुरूभजनाचा महिमा न कळे आगमा—निगमांसी ।
अनुभव ते जाणती जे गुरूपदिंचे रहिवासी ।
धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्‌गुरूरायाची ।
झाली त्वरा सुरवरां । विमान उतरायाची ॥ ४ ॥
प्रदक्षिणा करूनि देह भावें वाहिला ।
श्रीरंगात्मज विठ्ठल पुढें उभा राहिला ।
धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्‌गुरूरायाची ।
झाली त्वरा सुरवरां । विमान उतरायाची ॥ ५ ॥

## १७. ॥ प्रार्थना ॥

घालीन लोटांगण वंदीन चरण । डोळ्यानि पाहिन रूप तुझे हे ।
प्रेमे आलिंगन आनंदे पूजिन । भावे ओवाळिन म्हणे नामा ॥ १ ॥
त्वमेव माता च पिता त्वमेव । त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव । त्वमेव सर्वं मम देव देव ॥ २ ॥
कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा । बुद्ध्यात्मना वा प्रकृति स्वभावात् ।
करोमि यद्यत सकलं परस्मै । नारायणायति समर्पयामि ॥ ३ ॥
अच्युतं केशवं राम नारायणं । कृष्ण दामोदरं वासुदेवं हरिं ।
श्रीधरं माधवं गोपिका वल्लभं । जानकी नायकं रामचंद्रं भजे ॥ ४ ॥
हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।
हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥

# १८. ॥ प्रार्थना ॥

सदा सर्वदा योग तुझा घडावा। तुझे कारणी देह माझा पडावा।
उपेक्षु नको गुणवंता अनंता। रघुनायका मागणे हेची आता।
जय जय रघुवीर समर्थ॥
ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे। त्या त्या ठिकाणी निजरूप तुझे।
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी। तेथे सद्‌गुरू तुझे पाय दोन्ही।
जय जय रघुवीर समर्थ॥

# १९. ॥ प्रार्थना ॥

मोरया मोरया मी बाळ तान्हे। तुझीच सेवा करू काय जाणे।
अन्याय माझे कोटयान कोटी। मोरेश्वरा बा तु घाल पोटी।
गणपती बाप्पा मोरया॥ मंगलमूर्ती मोरया॥

डम डम डम डम डमरू वाजे। डमरू वाजे।
डमरूच्या नादात। डमरूच्या नादात माझा मोरया नाचे।
घण घण घण घण घंटा वाजे। घंटा वाजे।
घंटेच्या नादात। घंटेच्या नादात माझा मोरया नाचे।

गणपती बाप्पा मोरया॥ मंगलमूर्ती मोरया॥

श्री साई गणेशोत्सव मंडळ, उसरणी.

www.usarani.com

श्री साई गणेशोत्सव मंडळ, उसरणी.